**डॉ. अविनाश ढाकणे,** भाप्रसे
सदस्य सचिव
**Dr. Avinash Dhakne,** IAS
**MEMBER SECRETARY**

"Your Service is our Duty"

**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ**
**MAHARASHTRA POLLUTION CONTROL BOARD**

**जा.क्र. मप्रनि/प्रा.अ.जैवैक/ब-२७८** **दिनांक : २९/०८/२०२५**

# परिपत्रक

**विषय : पर्यावरण पुरक उत्सव साजरे करण्याबाबत.**

महाराष्ट्र शासनाने दिनांक ०१/०८/२०२५ रोजी मूर्ती विसर्जनासंदर्भात मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. सदर कार्यपद्धतीची अंमलबजावणी स्थानिक स्वराज्य संस्थांनी करणेबाबत दिनांक १८/०८/२०२५ रोजी कळविले आहे.

उत्सव साजरे करत असतांना बऱ्याच ठिकाणी विघटन न होणारे प्लास्टिक व थर्मोकॉलचा वापर उदा : एकल वापर प्लास्टिकची फुले, सजावटीचे सामान, प्लास्टिक प्लेट, प्लास्टिक ग्लास, प्लास्टिक पिशव्याचा मोठ्या प्रमाणात वापर केला जात असल्याचे निदर्शनास आले आहे.

महाराष्ट्र अविघटनशील कचरा (नियंत्रण) कायदा, २००६ अंतर्गत, प्लास्टिक आणि थर्माकॉल इत्यादीपासून बनवलेल्या अविघटनशील वस्तूंचे उत्पादन, वापर, विक्री, साठवणूक, वाहतूक यांचे नियमन करण्यासाठी, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र प्लास्टिक आणि थर्मोकॉल अविघटनशील वस्तूंचे (उत्पादन, वापर, विक्री, वाहतूक, हाताळणी आणि साठवणूक) अधिसूचना, दिनांक २३/०३/२०१८ नुसार एकल वापर प्लॅस्टिकच्या वस्तूंवर बंदी घालण्यात आली आहे.

उपरोक्त विघटन न होण्याऱ्या प्लास्टिकच्या वस्तूंचा वापर संपूर्ण टाळण्याच्या अनुषंगाने, आपल्या हद्दीतील मोक्याची ठिकाणे उदा. बस स्थानके, रेल्वे स्थानके, सार्वजनिक संस्था, बाजारपेठा, शहरातील महत्वाचे रस्ते इ. यांसारख्या सार्वजनिक ठिकाणी जाहिरात-फलक लावून जनजागृती करावी. तसेच स्वतंत्र पथके स्थापन करुन विविध आस्थापनांची व सार्वजनिक ठिकाणांची पाहणी करून सूचनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबत सर्व संबंधीतांनी दक्षता घ्यावी.

अविनाश ढाकणे

**(अविनाश ढाकणे, भा.प्र.से)**
**सदस्य सचिव**

२रा, ३रा, व ४था मजला, कल्पतरु पॉईंट, सायन मांटुगा स्किम रोड नं. ८, पीव्हीआर सिनेमा समोर, सायन सर्कल, सायन (पूर्व), मुंबई – ४०० ०२२. टेलि. : २४०१ ०७०६
2nd, 3rd & 4th Floor, Kalpataru Point, Sion Matunga Scheme Road No. 8, Opp. PVR Cinema, Sion Circle, Sion (East), Mumbai - 400 022. • Tel.: 2401 0706 • E-mail : ms@mpcb.gov.in • Website : www.mpcb.gov.in